घटकसंच
4

# अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील लैंगिक दृष्टिकोनाची उपयुक्तता

UN68MD04

## विविधता ओळखणे



*सौजन्य – डीजीएस, एनसीईआरटी*

आपण हे मान्य केले पाहिजे की वर्गातील मुलांच्या अस्तित्वाला बहुजातीय, बहुधार्मिक, बहुअपंगत्व असलेले आयाम म्हणून वर्गाचे सामाजिक आणि शैक्षणिक प्रोफाईल वर्ग बहुवर्गीय, बहुजातीय व बहुधार्मिक, बहुअपंगत्व असलेले विविध आयाम असतात. अशा प्रकारे वर्गखोलीमध्ये विविध जातीय, वांशिक, सांस्कृतिक वारसा व विविध सामाजिक, आर्थिक, पार्श्वभूमी असलेल्या तसेच विशेष गरजा असलेल्या, शिकणाऱ्या मुलांचा समावेश असतो. या सर्व घटकांवर लिंगातील विविधता ही विविध पातळीवर मात करते.

वर्गांमध्ये प्रवेश करीत असलेले प्रत्येक मूल हे आपल्या घरातून किंवा समाजातून काहीतरी शिकल्याशिवाय शाळेत दाखल होत नाही. विविध जातीय, वांशिक, सांस्कृतिक आणि सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी असलेली मुले शाळेत येतात, ते त्यांना मिळालेल्या कुटुंब व परिसरातील भाषा व संस्कृती द्वारे प्राप्त झालेल्या भाषिक व सांस्कृतिक मूल्यांसह.

**स्रोत– समावेशक वर्गातील अहवाल, सामाजिक समावेश/अपवर्जन आणि विविधता : दृष्टिकोन, धोरणे आणि सराव, काळजी, देशकल सोसायटी आणि युनिसेफ, देशकल पब्लिकेशन, दिल्ली, 2010**

### अध्ययनाची उद्‌दिष्टे

- शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामधील विद्यमान लिंग पक्षपाती दृष्टिकोन आणि वर्तन ओळखणे.
- विषयांतर्गत लिंग संवेदनशील शैक्षणिक अध्ययन–अध्यापन प्रक्रिया विकसित करणे.
- लैंगिक संवेदनशील वर्गाच्या वातावरणाला विकसित करणाऱ्या शैक्षणिक प्रक्रिया अवलंबिणे.

## विषयाची थोडक्यात ओळख :

या घटकसंचाद्‌वारे लिंग आणि अध्यापनशास्त्रीय प्रक्रियेबद्‌दल दृष्टिकोन तयार होतो. याद्‌वारे लैंगिक संवेदनशीलता विकसित करण्याच्या दृष्टीने विविध पैलूंवर प्रकाश टाकते आणि लिंग स्वभावाशी निगडित मुद्दे समजून घेणे आणि त्यांच्यामध्ये लिंग समावेशक पद्‌धती विकसित करण्याबद्‌दल व्यावहारिकदृष्ट्या मार्गदर्शन करते. लिंग अनुकूल वातावरणाला प्रोत्साहन देण्याकरिता घटकसंचामध्ये

कृतींचा व उपक्रमांचा समावेश करण्यात आलेला आहे. यामुळे शिक्षकांची भूमिका सोयीची करण्याकरिता व सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याकरिता मदत होईल. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या सामाजिकीकरण प्रक्रियेतील लिंग निष्ठ व रुढीवादी दृष्टिकोन समजून घेण्यास मदत होईल.

## अध्ययन निष्पत्ती

- शैक्षणिक दर्जा वाढविणे व मुलींचे सबलीकरण करण्याकरिता पाठ्यपुस्तक व अभ्यासक्रम भूमिका समजणे.
- स्त्रियांच्या विविध कार्यक्षेत्रातील यशस्वितेच्या प्रगतीचा शोध घेऊन व त्यासाठी त्यांनी केलेल्या योगदानाचा योग्य उदाहरणासह समजून घेणे.
- चिकित्सक परीक्षण करणे आणि विद्यमान रुढीवादी दृष्टिकोन आणि लिंग पक्षपाताशी संबंधित प्रश्न विचारणे.
- विविध प्रकारच्या भेदभावाचे स्वरूप ओळखता येणे व त्याचे स्रोत समजणे.
- राजकीय सामाजिक सांस्कृतिक आणि पर्यावरणीय प्रक्रियेत महिलांचा सहभाग व योगदान ओळखता येणे व त्यांची प्रशंसा करता येणे.
- विविध क्षेत्रातील महिलांच्या योगदानाबद्दल सोदाहरण स्पष्ट करणे.

### अध्ययन निष्पत्तीच्या साध्यतेसाठी अध्यापनशास्त्र :

सामाजिक योगदान ही एक निरंतर प्रक्रिया असून ती वैयक्तिक आणि सामूहिक प्रक्रियेचा एक भाग आहे. सामाजिकीकरण व शिक्षण यांसारख्या सामाजिक प्रक्रिया, सामाजिक बांधिलकी बांधणीसाठी मदत करतात. लिंग हे अशा समाज बांधणीचे उदाहरण आहे. लिंग हे स्त्री–पुरुष व तृतीयपंथी यांमधील जैविक फरक दर्शवितो, तर लिंगभेद हे स्त्री–पुरुष व तृतीयपंथी यांमधील सामाजिक व सांस्कृतिक दरीभेद दर्शवितो. लिंग संबंध व त्यांची कार्य गतिशील असणे व ती सामाजिक संबंध व परस्पर संबंध याद्वारे आकारित होतात ते वेळ आणि ठिकाण अनुसार आणि लोकांच्या वेगवेगळ्या गटानुसार बदलू शकतात. त्याचप्रमाणे त्यावर वंश, धर्म व वर्ग आणि अपंगत्व यासारख्या घटकांचाही परिणाम होतो.

आमची लैंगिक ओळख आम्हांला स्त्री–पुरुष किंवा तृतीय म्हणून कसे वागावे याची अपेक्षा निर्धारित करते तरीही लिंग भूमिकेवर योग्य की अयोग्य यावर वादविवाद होत असतात. हे सत्य आहे की, आपल्याला लिंगानुसार वेगवेगळी वागणूक दिली जाते. जी समानतेपासून आपल्याला दूर ठेवते किंवा आपल्याला वेगवेगळी वागणूक मिळते कारण आपण निसर्गतः वेगळे आहोत?

### कृती/उपक्रम :

| वैशिष्ट्ये | स्त्री | पुरुष |
|---|---|---|
| निर्भर अवलंबून | | |
| शक्तीशाली | | |
| भावनाशील/भावनिक | | |
| सक्षम | | |
| निर्णय घेणारा | | |
| घर सांभाळणारा | | |
| नेता | | |
| भित्रा आणि शूर | | |
| प्रबळ | | |
| भेकड | | |
| गप्पिष्ट | | |

यादी परिपूर्ण नसून तुम्ही यात अधिक आणखी उदाहरणे वाढवू शकता. ही कृती स्त्री व पुरुष यांच्याशी संबंधित असलेली सर्वसाधारण वैशिष्ट्ये ओळखण्यास मदत करते.

## कृती/उपक्रम :

प्रिंट मीडिया आणि नॉन प्रिंट मीडिया यामध्ये पुरुष आणि स्त्री या दोघांचे चित्रण कसे आहे, याचे विश्लेषण करा. जाहिरात करणारी महिला आणि पुरुष यांच्यातील विशेषणे ओळखा. पुरुष आणि स्त्रिया जाहिरात करीत असलेल्या उत्पादनांच्या सूचीची यादी तयार करा. मीडियामध्ये पुरुष व महिला कोणती कामे करीत आहेत? स्त्रिया व पुरुष यांच्या रूढीवादी गुणांवर या माध्यमांद्वारे जोर दिला जात आहे.अशा काही माध्यमांच्या चित्रणाबाबत सुद्धा चर्चा होऊ शकते, ज्यात लिंग रूढी मोडलेली दर्शविलेली आहे.

## शिक्षकांची भूमिका :

शिक्षकाच्या सामाजिकरणाचा परिणाम म्हणून लिंग पक्षपाती मनोवृत्ती किंवा दृष्टिकोन औपचारिक व अनौपचारिकरित्या निर्माण होतो म्हणूनच सर्व शिक्षकांनी वर्गांमध्ये प्रवेश करताना त्यांचे स्वतःचे पूर्वग्रहाचे ओझे/पक्षपातीपणा सोडून दिला पाहिजे.

विशेषतः अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या उपेक्षित गटातील मुली. त्या अनेकदा त्यांच्या स्वतःच्या शैक्षणिक वातावरणात अलिप्त, परके असल्याचे जाणवतात. कारण त्यांची आशय ओळखण्याची असमर्थता, पाठ्यपुस्तकातील पूर्वग्रह, तोचतोपणा, स्त्रियांची निष्क्रियता, निष्क्रिय भूमिका आणि पुरोगामी भूमिका असलेल्या पुरुषांच्या प्रती नेतृत्वामुळे भूमिका व जबाबदाऱ्या यांचे निवडक विवरण आणि विश्लेषणाचे वाटप अपमानजनक भाषांचा वापर इत्यादीच्या बाबतीत शिक्षकांचा भेदभावपूर्ण दृष्टिकोन इत्यादी गोष्टींमुळे त्या स्वतःला अलिप्त समजतात. अशी वृत्ती, असा दृष्टिकोन, कमी आत्मविश्वास आणि परकेपणाची भावना निर्माण करते. ज्याचा परिणाम वर्गातील उपक्रमांमध्ये त्यांच्या सहभागावर होतो तेथेच शिक्षक अर्थपूर्ण भूमिका बजावू शकतो. एकात्मीकरणाबरोबरच शिक्षकाने अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत सहभागी वातावरण तयार करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या तात्काळ वातावरणातून शिकण्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते. या शिक्षणप्रक्रियेत मुलीदेखील सक्रियपणे सहभागी आहेत हे सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे. शिक्षकाने प्रथम सर्व शैक्षणिक उपक्रमातील लिंगभेद ओळखले पाहिजेत आणि त्यानंतर वर्ग आणि वर्ग बाहेरील उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करावी. अशा प्रयत्नातून वर्गातील वातावरण निर्माण करणे आणि सक्षम करणे शक्य होईल जिथे मुलींसह सर्व विद्यार्थी आपले अनुभव सांगू शकतील. विद्यमान पूर्वग्रह आणि रूढी वर प्रश्न विचारू शकतात. चर्चा आणि वादविवादाच्या आधारे योग्य मार्ग/तोडगा काढू शकतात.

अभ्यासक्रमात मुख्यत्वे शाळेत शिकविले जाणारे सर्व आवश्यक आणि योग्य ज्ञान समाविष्ट केले जाते. तथापि शाळेत औपचारिक पद्धतीने शिकविल्या जाणाऱ्या काही बाबी आहेत. ज्या काही शाळाप्रणालीमध्ये औपचारिकरित्या शिकविल्या जातात. त्याला लपलेला अभ्यासक्रम म्हणतात. यात शालेय प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी घेतलेले वर्तन आणि दृष्टिकोन यांचा समावेश आहे. शिक्षकांनी समजून घेणे महत्त्वाचे आहे की लपलेला अभ्यासक्रम म्हणजे विद्यार्थ्यांनी शाळेत औपचारिक अभ्यासक्रम ग्रहण केलेला भाग असू शकतो किंवा नसू शकतो. उदाहरणार्थ – विद्यार्थ्यांमधील समवयस्क, शिक्षक किंवा इतर प्रौढ व्यक्तींमधील संवाद, भिन्न भिन्न वर्गाच्या, धर्माच्या आधारावर किंवा भिन्न लिंगाच्या लोकांना ते कसे ओळखतात, कसे समजतात हे महत्त्वाचे आहे. त्यात अज्ञातरितीने वर्गात आणि बाहेरील ठिकाणी होत असलेल्या शिक्षणाचा समावेश आहे. यात विद्यार्थ्यांना स्वीकार्य किंवा अस्वीकार्य वाटणाऱ्या कल्पना आणि वर्तन देखील समाविष्ट आहे. अशा कल्पना आणि वर्तन सामान्यतः औपचारिक सेटिंगमध्ये न स्वीकारलेली असतात आणि असे मानले जाते की त्यांना बदलण्याची आवश्यकता नाही लिंग अपरिहार्यपणे या लपलेल्या अभ्यासक्रमाचा एक घटक बनलेला आहे. मुला–मुलींना वेगवेगळी कामे देणे, दिनचर्या, विधी व दैनंदिन क्रिया, उपक्रम यामधील पद्धती बक्षिसे व शिक्षणाची व्यवस्था शिस्तबद्ध यांसह वर्ग आणि शाळेत शारीरिक जागांचे विभाजन यांसह संघटनात्मक व्यवस्थेतून त्यांचा व्यवहार होतो.

शिक्षकांचे लेबलिंग नमुने, शिक्षक–विद्यार्थी आणि विद्यार्थी–विद्यार्थ्यांमधील संवाद, मुला–मुलींनी शाळेत वापरल्या जाणाऱ्या खेळाच्या जागेची सीमा आणि त्यांना दिलेले औपचारिक खेळ देखील भिन्न असतात.

आपण कधी विचार केला आहे का की, एखाद्या शाळेतील कार्यक्रमात फक्त मुलींना किंवा महिलांना मुख्य अतिथीला पुष्पगुच्छ देण्यासाठी का बोलाविले जाते?

**विषय व्यवहारातील लैंगिक चिंतांचे एकत्रीकरण :**

हे सर्वज्ञात सत्य आहे की लिंग ही सर्व विषयांमधील चिंताजनक बाब आहे आणि ते ज्ञान निर्मितीसाठी मूलभूत आहे. शाळेतील मुली आणि स्त्रिया यांचे प्रतिनिधित्व आणि त्यांच्या अदृश्यतेकडे लक्ष देणे आवश्यक आहे. प्रत्येक विषयाला दिले गेलेले ज्ञान आणि भाषेचे माध्यम लिंगाची विषमता, असमानता नैसर्गिक वाटते. असमानतेचे निराकरण करण्यासाठी त्यास गंभीरपणे आव्हान देणे आणि ज्ञानाचा उलगडा करणे आवश्यक आहे.

**भाषेच्या शिक्षणाद्वारे लिंग समायोजित करणे :**

भाषा ही सर्व विषयाला समावेशित असून ते ज्ञान निर्मितीसाठी मूलभूत आहे परिणामी त्यांचा लिंग संबंधावर व्यापक परिणाम दिसून येतो, म्हणूनच भाषेच्या कृतींद्वारे आणि त्यातील नैसर्गिक सामर्थ्यांमधील फरकांद्वारे विद्यार्थ्यांना संवेदनशील करणे महत्त्वाचे आहे हे केवळ अस्तित्वात असलेल्या प्रकल्पाचा नाही तर त्याकडे आपला दृष्टिकोन देखील आकार घेतो. अशाप्रकारे भाषेचा वेगळ्या पद्धतीने वापर केल्यास खऱ्याअर्थाने परिस्थिती बदलू शकते.

स्पष्टीकरण आणि इतर दृश्य साधनांसह भाषा अशा ज्ञानाच्या निर्मितीमध्ये मध्यवर्ती भूमिका बजावते आणि आपल्याला या ज्ञानाच्या पैलूकडे त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे म्हणूनच शिक्षक लिंग समभावाच्या दृष्टीने आवश्यक भाषेच्या प्रचारात महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात. जर आपण भाषेचे काळजीपूर्वक विश्लेषण केले तर आपल्याला असे दिसून येते की शब्द आणि अभिव्यक्ती यासारखे घटक मोठ्या प्रमाणात लैंगिक रूढीवाद टिकवून ठेवतात म्हणून वर्गामध्ये लिंग समभावाशी अशी निगडित नैसर्गिक भाषा वापरली जाणे आवश्यक आहे. एक उदाहरण म्हणून आपण घेऊ या 'माणूस'. हा शब्द सामान्य शब्द नाही. माणसे यासारख्या शब्दाच्या पर्यायाबद्दल आपण विचार करायला पाहिजे. काही पर्याय म्हणजे 'मानव किंवा मानवता'.

आपली भाषा ही लैंगिक समावेशक आणि लिंग तटस्थ अशी दोन्ही प्रकारची असावी. भाषेतील लैंगिकतेचे सामान्य प्रदर्शन म्हणजे पुरुषवाचक नामाच्या जसे की (माणूस, पोलिसवाला) आणि पुरुषवाचक सर्वनामे जसे की (त्याला, तो) सामान्य वापर होय. जेव्हा ते सर्वसाधारणपणे लोकांचा संदर्भ घेतात किंवा जेव्हा संबंधित व्यक्तीचे लिंग माहीत नसते. तेव्हा सर्वनाम निवडण्याच्या व्यतिरिक्त आपण लिंग तटस्थ शब्दावली वापरण्याच्या बाबतीत सुद्धा संवेदनशील असले पाहिजे. अशा प्रकारे आपण लिंग तटस्थता मिळू शकतो म्हणजेच काही मनुष्य संयुगे (उदाहरणार्थ – अध्यक्ष, प्रवक्ता, विक्रेता, फोर मेन) आणि चिन्हांकीत रूपे (उदा. महिला, डॉक्टर महिला, शिक्षिका) आणि यांसारख्या सममित वाक्प्रचारांचा वापर. महिला, पुरुष पत्रकार, कॅमेरामन, कॅमेरा वुमन असे त्याचप्रमाणे श्री., श्रीमती, कुमारी यासारख्या सन्माननीय गोष्टी श्री. आणि श्रीमतीकडे बदलल्या आहेत की त्यामुळे लिंग भूमिकांकडे लक्ष वेधले जात नाही.

**कृती :**

खाली काही शब्द दिले आहेत त्यांचे लिंग तटस्थ रूप दिलेल्या रिकाम्या जागेत लिहा.

- कारभारी ....................................................................
- पोलिस ....................................................................
- मेल मॅन ....................................................................
- अध्यक्ष ....................................................................
- प्रवक्ता ....................................................................
- अँकर मॅन ....................................................................
- कवयित्री ....................................................................

- अभिनेत्री ..................................................................
- मनुष्य, मानव जात ..................................................................
- मनुष्यबळ ..................................................................
- पत्नी किंवा पती ..................................................................
- आईपण ..................................................................
- विक्री ..................................................................
- गृहिणी ..................................................................
- पुढारी ..................................................................

**चर्चा :**

अनेक स्थितियों में शिक्षक/शिक्षिकाओं की भाषा शैली 'पुरुषत्व' और 'नारीत्व' की पारंपरिक मान्यताओं को पुनर्स्थापित ही करती है। भाषा का विचारों और व्यक्तिगत पहचान से गहरा संबंध है। शिक्षक/शिक्षिकों द्वारा बोली जा रही भाषा कुछ इस प्रकार की सीमाएं तय कर देती है कि, लड़कियों और लड़कों में जेंडर भेद स्वयं आकर ले लेता है। नीचे दी गई स्थिति आम भारतीय समाज से ली गई है। जेंडर संवेदनशीलता के परिप्रेक्ष्य में ये किस प्रकार से और क्यों असामान्य और अटपटी है, इस पर चर्चा करें।

**स्थिती :**

एक परिवार के जुड़वा भाई–बहन दसवीं कक्षा की बोर्ड की परीक्षा में एक समान विशेष योग्यता वाले अंक लाये हैं। वे इस समय ग्यारहवीं कक्षा की भौतिकी की अध्यापिका के पास बैठे ग्यारहवीं कक्षा में विषयों के चयन पर बातचीत कर रहे हैं–

**बहन** : मैम आपको पता है न, मुझे भौतिकी कितनी पसंद है।

**भाई** : हाँ मैम, कादंबरी तो घर में छोटे–मोटे प्रयोग करती रहती है। बल्ब फ्यूज हो तो यह ठीक करेगी। इसे फिजिक्स ही दीजिए।

**अध्यापिका** : कौस्तुभ ये क्या कह रहे हो। मेरिट में आकर वोकेशनल स्ट्रीम और वह भी ड्रेस डिजाइनिंग। तुम फिजिक्स में आओ और कादंबरी को बायो लेने दो। उसमें रटकर काम चल जाता है। लड़कियाँ अच्छे से रट लेती हैं।

**भाई–बहन** : मैम, आप तो खुद महिला हैं और फिजिक्स की टीचर भी, आपने..

**अध्यापिका** : बस जैसे–तैसे कर ली मैडम क्यूरी तो नहीं बन गई न।

### वरील उदाहरण एनसीईआरटी पाठ्यपुस्तकातील मेरीगोल्ड इयत्ता पाचवी मधील आहे.

**उदाहरण – 1**

"Who will be Nigathou" ही मणिपूरच्या राजा आणि राणीची एक कथा आहे. ज्यांना तीन मुले आणि एक मुलगी होती. तीन मुले असूनही त्यांनी आपल्या मुलीला पुढील वारस म्हणून निवडले. अशाप्रकारे मोठ्या मुलाला पुढील राजा म्हणून घोषित करण्याच्या या जुन्या प्रथेला त्यांनी छेद दिला.

### चर्चेचे मुद्दे :

- मुलींच्या सद्य:स्थितीवर परिणाम करणारे समाजातील इतर पुरुषप्रधान पितृसत्ताक नियम काय आहेत?
- चांगला शासक होण्यासाठी शारीरिक गुणधर्म पुरेसे आहेत का?

- सत्ता आणि अधिकार मिळविण्याच्या बाबतीत पुरुषांपेक्षा मुली किंवा महिला कमी सक्षम आहेत काय?
- शक्तिशाली आणि निर्णय घेण्याच्या भूमिकेत महिलांच्या स्थानिक उदाहरणांचा परिचय द्या.

**उदाहरण – 2**

- मेरीगोल्ड (वर्ग 5 पृष्ठ क्रमांक 165) चर्चा करू.

**पुढील उतारा काळजीपूर्वक वाचा :**

एक दिवस मीना एक आंबा तोडून घरी आणते. तिची आजी मोठा तुकडा राजूला देते कारण तो मुलगा आहे. मीना त्याला विरोध करते. शेवटी आंबा तिने आणलेला असतो आणि ती या दोघांपैकी मोठी आहे आणि ती आग्रह धरते की तिचा वाटा अधिक मोठा आहे तिचे वडील तिच्या मदतीला येतात आणि त्या आंब्याचे सारखे भाग करतात.

**आता प्रश्नांची उत्तरे द्या :**

1. आंबा कोणी घरी आणला होता?
2. मीनाच्या आजीने राजूला मोठा वाटा का दिला?
3. तुमच्या मते कोणाला मोठा वाटा मिळाला पाहिजे होता?

**चर्चेचे मुद्दे :**

- तुम्ही तुमच्या कुटुंबांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव पाहिला आहे का? जो मुलगा व मुलगी यांच्यामध्ये साधनांच्या किंवा इतर वाटणीच्या बाबतीत केला जातो. शारीरिक हालचाल फिरणे वेळेवर प्रतिबंध करणे किंवा यांसारखे इतर.
- रूढीवाद नष्ट करण्यासाठी समाजातील सर्व पुरुष सदस्यांनी सहभाग घेणे महत्त्वाचे आहे का?

**सामाजिक शास्त्राच्या अध्यापनाद्वारे लिंग समभावाची रुजवणूक :**

प्राथमिक शिक्षणाच्या आरंभापासून सर्व शालेय शिक्षणाच्या सर्व पातळ्यांवर सामाजिक शास्त्र हा शालेय अभ्यासक्रमाचा एक अत्यंत महत्त्वपूर्ण भाग आहे. हे वैयक्तिक आणि सामूहिक मानवी वर्तन प्रकट करण्याचा प्रयत्न करते. जे कुटुंब समुदाय, संस्कृती संस्था, पर्यावरण समाज आणि कल्पना मानके आणि मुले यावर प्रभाव टाकतात. सामाजिक शास्त्राची प्राथमिक उद्दिष्टे हे आहे की, (अ) लिंग, धर्म, प्रदेश, वर्ग आणि अपंगत्व यासंदर्भातील विविधता ओळखणे आणि त्याचा आदर करणे. तसेच सर्व व्यक्तीकडे समान दृष्टीने पाहणे याकरिता विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्यासाठी चिकित्सक दृष्टी प्रदान करणे. (ब) लोकशाही आणि हुकुमशाही, सत्ता आणि कारभार, जात–जमाती, वंश, लिंग, रूढीवादी त्यासंबंधीचे पूर्वग्रह इत्यादी विषय आणि मुद्द्यांवर वर्गात मुद्दाम भर देणे. (क) सामाजिक, राजकीय, आर्थिक संस्था या विषयांचा बुद्धी आणि असमानतेचे विविध आयाम स्त्रियांचा दर्जा व स्थितीवर परिणाम करतात. त्यांचे चिकित्सक परीक्षण करणे. (ड) प्राप्त कल्पना, रूढी विचार आणि पद्धतीला प्रश्न विचारून परीक्षण करणे.

ज्या काही प्रमुख स्त्रियांनी सत्ता चालविली, जमिनीशी जुळून काम केले किंवा राष्ट्रीय चळवळीत भाग घेतलेल्या काही स्त्रियांची केवळ मोजणी केली तरी 'ऍड अँड स्टीर ऍप्रोच' प्रमाणे काही महिलांचाच समाज दिसतो. फार कमी सहभाग दिसतो हे काही अंशी कारण आहे की पाठ्यपुस्तकातील मजकुरातील पुरुषांच्या भूमिकेस महत्त्व दिले आहे आणि सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वगळला आहे. सामाजिक शास्त्राच्या पाठ्यपुस्तकातील विविध घटकांतर्गत विविध मुद्द्यांच्या संदर्भात चर्चेसाठी महिलांचा अविभाज्य भाग म्हणून समावेश करण्याची काळजी घेतली आहे.

सामाजिक शास्त्राचा एक महत्त्वाचा विषय म्हणजे अध्ययन प्रक्रियेत संबंधित आणि योग्य स्थानिक संदर्भांचा समावेश व कृतीचा अंतर्भाव करणे. अपरिचित शैक्षणिक अध्यापनशास्त्र, आशय ज्ञान आणि अभ्यासक्रमातील घटक विद्यार्थ्यांमध्ये परस्परांविषयी गैरसमजाच्या भावना निर्माण करू शकतात. ज्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या चर्चेत आणि वर्ग अंतर्गत कृतीमधील सहभाग कमी होऊ शकतो म्हणून अभ्यासक्रमातील घटकांचे स्थानिक संदर्भानुसार मांडणी आणि नावीन्यपूर्ण अध्ययन–अध्यापन साहित्य तसेच योग्य

नियोजन पूर्वक केलेली अध्ययन–अध्यापनाची योजना, विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील आशयाशी जोडण्यास, निगडीत राहण्यास व स्वतःचे अनुभव व्यक्त करण्यास आणि रचनात्मक प्रश्नांची उत्तरे देणारी परिस्थिती ओळखण्यास सक्षम करते. विशेषतः वंचित मुलींसाठी आणि अध्ययनार्थीसाठी वर्गांतर्गत लोकशाही असणे आवश्यक आहे. ज्याद्वारे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेवर चर्चा करणे रूढीवादी प्रश्नांसाठी प्रश्न विचारणे आणि माहिती देऊन निवड करता येणे इत्यादी साठी भरपूर वाव मिळेल.

**प्राप्त मते, रूढी, विचार, कार्य यांचे परीक्षण व प्रश्न विचारणे :**

समाजाकरिता तयार झालेले निकष व पूर्वग्रह इत्यादी बाबत प्रश्न विचारणे हा सामाजिक शास्त्राचा अभ्यास करण्याचा एक महत्त्वाचा दृष्टिकोन आहे. यामुळे विद्यार्थी त्यांच्या जीवनातील अनुभवाचा सामना करण्यास सक्षम होतील. ज्यामुळे विश्लेषणात्मक आणि सर्जनशील मानसिकतेचा पाया घातला जाईल म्हणून शिक्षकांनी या तथ्याविषयी चर्चा करावी. जेणेकरून विद्यार्थी विद्यमान संस्था त्यांचे विचार, कल्पना व कार्यपद्धती आणि भूतकाळाशी संबंध जाणून त्यावर प्रश्न विचारतील. ऐतिहासिक काळापासून भारतीय समाजात जाती, वर्ग आणि लिंग यांच्याआधारे भेदभाव कसा चालला आहे याची आपल्याला जाणीव आहे. अशा प्रकारे फार पूर्वीपासूनच प्रचलित रूढींवर प्रश्न विचारण्यास स्त्रिया लाजत नव्हत्या.



शिक्षण तज्ज्ञ व साहित्यिक बेगम रुकीया सखावत हुसैन यांनी पटना व कोलकाता येथील मुस्लिम मुलींसाठी शाळा सुरू केली. प्रतिगामीवादी विचारसरणीवर निर्भय टीका करणारी होती. प्रत्येक धर्मातील धार्मिक नेता महिलाना निकृष्ट स्थान देतात असे त्यांचे मत होते. बेगम रुकीया सखावत हुसैन यांनी 1905 मध्ये 'सुलताना चे स्वप्न' नावाची एक उल्लेखनीय कथा लिहिली. ज्यात सुलताना लेडी लैंड नावाचा ठिकाणी पोहोचते. जेथे स्त्रियांना शिकणे, काम करणे तसेच पाऊस नियंत्रित करणे, एयर कार उडविणे यावर संशोधन करण्याचे स्वातंत्र्य होते.

**सामाजिक आणि राजकीय जीवन (इयत्ता आठवी)**



लक्ष्मी लक्रा ही उत्तर रेल्वेची पहिली महिला ड्राइव्हर आहे. गरीब कुटुंबातील लक्ष्मीने कठोर परिश्रम घेऊन अभ्यास करून इलेक्ट्रॉनिक मध्ये डिप्लोमा पूर्ण केला. त्यानंतर तिने रेल्वे बोर्डाची परीक्षा दिली आणि तिच्या पहिल्याच प्रयत्नात ती उत्तीर्ण झाली. लक्ष्मी म्हणते, 'मला आव्हाने आवडतात' आणि ज्या क्षणी कुणी म्हणत की हे काम मुलींसाठी नाही, त्याच वेळेस त्या कामामध्ये मी खात्रीपूर्वक पुढे जाते.

**सामाजिक आणि राजकीय जीवन (इयत्ता आठवी)**

**कृती :**

1. खालील वाक्य फळ्यावर लिहा व मुलांना प्रत्येक वाक्यविधान वाचायला सांगा.
   - मुलींचे लवकर लग्न.
   - मुलगा हा कौटुंबिक मालमत्तेचा कायदेशीर वारस आहे.
   - पुरुष हे देखभाल करणारे, पालन–पोषण करणारे आहेत.
   - स्पृश्यास्पृश्यता पाळणे.
   - हुंडा प्रथा पाळणे.
   - मुलांना मुलींपेक्षा जास्त प्राधान्य.

- पाळी निषिद्ध मांडणे.
- मुलींच्या शारीरिक हालचालींवर निर्बंध.
- विधवांचा एकांतवास, विधवांची अवहेलना.
- मुली या कुटुंबातल्या कायमस्वरूपी सदस्य नसतात. मुलींना परक्याचे धन समजले जाते.

2. विद्यार्थ्यांना वरील विधानातून विधाने निवडून खाली दिलेल्या योग्य त्या चौकटीत ठेवायला सांगा.

| | | |
|---|---|---|
| प्रथा/पद्धती/ निकष अजूनही प्रचलित आहे. | या प्रथा/पद्धती/ निकष यामध्ये मला बदल करायला आवडेल. | प्रचलित नसलेल्या प्रथा/परंपरा/ पद्धती/निकष |

या कृतीमधून शिक्षकांना सामाजिक जीवनातील वास्तविकतेमध्ये समोर जाव्या लागणाऱ्या संस्कृती प्रथा-परंपरा, निकष, रूढी याविषयी विद्यार्थ्यांमध्ये किती जागृतता आहे हे ठरविण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे काही रूढी, प्रथा, परंपरा यामध्ये बदल होणे का गरजेचे आहे. यावर मुला-मुलींमध्ये चर्चादेखील घडवून आणता येईल.

**आर्थिक प्रक्रियेत महिलांचा सहभाग –**

एनसीईआरटी इतिहास पाठ्यपुस्तक, आमचा भूतकाळ III, प्रकरण चौथे, आदिवासी आणि सुवर्णयुगाचे दर्शन.

**आदिवासी महिलांची आर्थिक कार्यात भूमिका : शिकण्याचे वातावरण समकालीन परिस्थितीशी जोडणे.**

ट्रिक्स आणि सुवर्ण क्लिक दृष्टी हे प्रकरण अध्याय आदिवासी समाज आणि त्यांच्या वसाहतीचे नियम यामुळे त्यांच्या जीवनावर कसा परिणाम झाला, यावर लक्ष केंद्रित करते. स्त्रोत आदिवासी महिलांची महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्टपणे दर्शविते. शेकडो वर्षांपूर्वी घडलेल्या घटनेशी जुळवून घेणे कधीकधी नवीन विद्यार्थ्यांना अवघड जाते त्यामुळे भूतकाळाला वर्तमानाशी जोडणे आवश्यक आहे. प्रागैतिहासिक काळापासून आजपर्यंतच्या आर्थिक कार्यात महिलांचा सहभाग हा एक प्रवास आहे. ज्याला आपल्या पाठ्यपुस्तकातील पुस्तकांमध्ये वारंवार दुर्लक्षित केले गेले आहेत. पुस्तकाव्यतिरिक्त वर्तमानपत्र, जरनल्स, दृक-श्राव्य साहित्य यांसारख्या इतर साहित्यांचे स्त्रोत, तथ्यांच्या देवाण-घेवाण यामध्ये समकालीन दृष्टिकोन निर्माण करण्यास शिक्षकांना मदत करतात.




**ओडिसामधील डोंगरिया कंधा या जमातीच्या स्त्रिया अर्थार्जनासाठी वेगवेगळी कार्ये करताना.**



**आदिवासी महिला सेंद्रिय शेतीमध्ये रूपांतर घडविताना**



**आदिवासी महिला कल्याणी मिश्र यांची भाजीपाल्याची शेती, बुडाजरण गाव, सुंदरगड**

ओरिसामधील सुंदरगड जिल्ह्यातील आदिवासी महिलांनी सेंद्रिय शेतीतून सुरक्षित आणि पौष्टिक अन्नधान्याची निर्मिती केली आहे. ज्यामुळे अन्नसुरक्षा व उत्तम उदरनिर्वाह साधला जातो. हजारो शेतकऱ्यांनी कृत्रिम, सिंथेटिक किंवा अजैविक खतांचा कधीही वापर केला नाही. ब्राम्हण मारा खेड्यातील निर्मला बारला एक उत्कृष्ट शेतकरी म्हणतात, ''आम्ही जे काही वापरतो ते सर्व सेंद्रिय असते इतकेच नव्हे तर बियाणांचे वाण देखील देशी असतात.'' जे आमच्याच शेतीमध्ये तयार केले जातात. ते कडूलिंबाची पाने, उच्च प्रतीचा मोहवा लसुण, गाईचे शेण व गोमूत्र असे वेगवेगळे घटक वापरून सेंद्रिय कीटकनाशके तयार करतात.

### कृती : सहा विद्यार्थ्यांचा गट

### आदिवासींच्या आर्थिक कार्यात आदिवासी महिलांच्या भूमिकेविषयी पोस्टर गॅलरी

या उपक्रमाद्वारे विद्यार्थी आदिवासी महिलांची अर्थार्जनाच्या कार्यातील भूमिका तसेच ती वर्षानुवर्ष कशी विकसित होत गेली याविषयी आपली मत मांडू शकतात. शिक्षक विद्यार्थ्यांना खालील टप्प्यानुसार मार्गदर्शन करू शकतात.

**टप्पा 1 –** 6 विद्यार्थ्यांच्या गटास एखाद्या विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या आदिवासींचा समुदाय नेमला जाऊ शकतो.
उदा. पश्चिम भागातील भिल्ल, उत्तर पूर्वेकडील खासिस, मध्य भारतातील गोंड किंवा उत्तर प्रदेशातील गादीज् इत्यादी.

**टप्पा 2 –** विद्यार्थ्यांकडून साहित्य गोळा करून घ्यावे. ते साहित्य असे असू शकेल.
(अ) छायाचित्र, वर्णनात्मक चित्रे, (ब) पोस्टर, (क) पत्रके, (ड) बातम्या क्लिपिंग, (इ) शेती आणि इतर उपक्रमावरील लोकगीते.

**टप्पा 3 –** पोस्टर तयार करणे.
(अ) नकाशाद्वारे आदिवासींच्या गटाचे स्थान
(ब) पोस्टर हे आदिवासी अर्थव्यवस्थेमध्ये आदिवासी महिलांचे महत्त्वपूर्ण स्थान दर्शविणारी व त्यासंबंधात मजकूर असणारी असावी.
(क) आदिवासी समुदायाच्या आर्थिक कार्यात सातत्य आणि बदल.

**टप्पा 4 –** चर्चा पूर्ण झाल्यावर वर्गात पोस्टर प्रदर्शित केले जाऊ शकतात आणि त्यानंतर शिक्षकांनी चर्चा घडवून आणावे.

## चर्चेचे मुद्दे :

- देशामधील आदिवासी समूहातील महिलांनी केलेल्या कार्यात समानता आढळते काय?
- आदिवासी समूहातील सदस्यांच्या आर्थिक कार्यात लिंगभेद आढळतो काय?
- गेल्या अनेक वर्षात आदिवासी महिलांच्या आर्थिक कार्यात सहभाग कसा वाढला आहे?
- आर्थिक प्रक्रियेत आदिवासी महिलांच्या जीवनावर विकासाचा कसा परिणाम झाला आहे?

## गणिताच्या अध्यापनाद्वारे लिंगसमभाव रुजवणूक :


प्रत्येकजण गणित शिकतो परंतु बऱ्याच मुलांना विशेषत: मुलींकरिता गणित हे क्षेत्र अद्यापही दुर्गम आहे. आपण पुरुष प्रभावी गणिताचा कमी प्रमाणात विचार करायला पाहिजे. हा एक सामान्य समज आहे की, गणित हा विषय मुलींकरिता नाही. तसेच मुलींच्या शिक्षणात लैंगिक भेदभाव व रूढीवादीपणाला सुद्धा वाव नाही. मात्र ही एक कल्पना आहे. ही कल्पना धर्म अभ्यासक्रमाद्वारे आणि शिक्षकांच्या अध्यापनातून दूर करणे व स्पष्ट करणे महत्त्वाचे आहे. गणिताच्या अध्ययन–अध्यापनातून हे निश्चित बिंबविणे आवश्यक आहे की, घरकाम करणेही तेवढेच महत्त्वाचे व उत्पादनक्षम असते. विविध गणितीय उदाहरणाद्वारे हे वर्गात सादर करावयास हवे. तसेच ही कुटुंबातील सर्व सदस्यांची सारखी जबाबदारी आहे हे सुद्धा प्रकर्षाने वर्गात सांगावे. प्रत्येक कामामध्ये वेळ, श्रम आणि ऊर्जा यांची गणना करणाऱ्या व्यवस्थेद्वारा सर्व क्षेत्रातील कामाचे मोठेपण प्रतिबिंबित केले पाहिजे. व्यवस्थापक, व्यापारी, उद्योजक, पायलट, वैज्ञानिक, गणिततज्ज्ञ यांसारख्या सर्वच क्षेत्रात महिला मुलींच्या वाढत्या सहभागीतेच्या भूमिकेला प्रोत्साहित केले गेले पाहिजे.

### कृती 1 :

जनगणना 2011 चा देश व राज्य पातळीवरील लोकसंख्याविषयक माहिती विद्यार्थ्यांना पुरवा. विद्यार्थ्यांना सदर माहितीचा अभ्यास करायला सांगून नंतर त्याची तुलना करावयास सांगा. आता त्यांना देश पातळीवर तसेच राज्य पातळीवर स्त्रियांचे लोकसंख्येतील पुरुषांच्या तुलनेत प्रमाण कमी असण्याविषयी विश्लेषण करावयास सांगा. या कृतीद्वारे विद्यार्थ्यांमध्ये स्त्री–पुरुष लिंग गुणोत्तर प्रमाणात स्त्रियांचे प्रमाण घटत असल्याबाबत जाणीव निर्माण करावयाची आहे.

### कृती 2 :

रुक्ष गणितीय आकडेमोड व गणितीय उदाहरण यांच्या पलीकडे जाऊन हे बघणे जसे की आपण बातम्यांमध्ये सुद्धा बघतो की स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी मजुरी दिली जाते. या पद्धतीच्या उदाहरणांना, प्रतिसादांना शिक्षकांद्वारे वर्गात प्रोत्साहन दिले गेले पाहिजे.




प्राथमिक स्तरावरील एनसीईआरटी चे पाठ्यपुस्तक मॅथ मॅजिकमध्ये अशी बरीच उदाहरणे आहेत. ज्यात स्त्रियांचे उत्पादक आणि निर्णय घेणारी असे चित्रण केले आहे. जसे की, उद्योजक शेतकरी, मालमत्ता मालक इत्यादी. पुरुष पात्र स्वयंपाकासारख्या घरगुती कामात व्यस्त असल्याचे दर्शविले आहे. स्त्रियांचे चित्रण त्या आपल्या हक्कांसाठी उभ्या असलेल्या आणि शक्ती संबंधांना आव्हान करीत असल्याचे दर्शविले आहे.

विज्ञान अध्यापनातून लिंगसमभाव रुजवणूक स्त्रियांना पूर्वीपासूनच विज्ञान आणि तंत्रज्ञानापर्यंत मर्यादित प्रवेश होता आणि बौद्धिक, वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानाच्या समुदायामधून तर जवळजवळ स्त्रियांना वगळलेलेच आहे. त्या नेहमीच पालनपोषण, मुलांचे संगोपन, घर सांभाळणे इ. गोष्टींशी संबंधित आहेत.

दस्तावेजाच्या अभावामुळे विज्ञान व तंत्रज्ञानाच्या बाबतीत स्त्रियांचे असलेले योगदान इतिहासापासून अलिप्त, लपलेले राहिले आहेत. तंत्रज्ञानाच्या विकासामध्ये स्त्रियांचा सहभाग असून देखील तंत्रज्ञानाच्या बाबतीत सामान्यपणे असे मानले जाते की स्त्रिया काही करतात ते तंत्रज्ञान विहीन असते. पुढे विज्ञानाची प्रतिमा पुल्लिंगी म्हणून ओळखली जाते आणि विविध सामाजिक–सांस्कृतिक कारणांमुळे मुली, स्त्रिया तंत्रज्ञानाशी संबंधित असलेल्या क्षेत्रात प्रवेश करण्यास संकोच करतात.

विज्ञान तर्कसंगत विचार करण्यास प्रवृत्त करते. ज्यामुळे वर्ग, जाती, लिंग आणि धर्म यांवर आधारित पूर्वग्रह कमी होण्यास मदत होते. विज्ञानाद्वारे विद्यार्थ्यांना हे शिकविले जाऊ शकते की, शारीरिक गुणधर्म आणि फलकांद्वारे श्रेष्ठत्व किंवा निकृष्ट, प्रतिबिंबित होत नाहीत. मुलांमध्ये व मुलींमध्ये आणि लिंगातील विशेषतांमध्ये दरी असल्याने लिंगभेद होऊ नये. शरीररचना, कार्य आणि आवश्यकता देखील मुले–मुली व तृतीयपंथींसाठी समान आहेत. एखादे लिंग श्रेष्ठ ठरविण्याऐवजी इतरांपेक्षा श्रेष्ठ असणे असे वर्गीकरण करण्यासाठी सर्व लिंगाच्या अभिनय क्षमता ओळखायला पाहिजे आणि म्हणूनच अन्न, आरोग्य सेवा व अध्ययन अनुभव देताना हे भेदभाव केला जाऊ नये. पर्यावरणाचे रक्षण करण्यामधील महिलांची भूमिका व त्यांचा त्यांच्या आरोग्यावर होणारा परिणाम, दुष्परिणाम यावर प्रकाश झोत टाकायला हवा.

## कृती

आपल्या परिसरातील किंवा राज्यातील विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात यशस्वी झालेल्या कोणत्याही दोन स्त्रियांबद्दल विद्यार्थ्यांशी चर्चा करा. तसेच त्यांच्या आयुष्यात आलेल्या यशोगाथा विषयी त्यांना अनुभव कथन करायला सांगा. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात महिलांनी अनुभवलेले भेदभाव कोणत्या प्रकारचे आहेत?

तरुण भारत संग्रह यासारख्या संघटनेच्या मदतीने अलवर येथील दारकी माई या महिलेने तलाव बांधून पाण्याची समस्या कमी ठेवल्यास मदत केली तसेच दुसरे उदाहरण म्हणजे झारखंडमधील आदिवासी समाजाच्या सूर्यमणी या स्त्रीने आपल्या राज्यातील जंगले जोपासण्यासाठी केलेले प्रयत्न. अशा उदाहरणांचा समावेश एनसीईआरटी च्या इयत्ता पाचवीच्या पर्यावरणशास्त्र या पाठ्यपुस्तकात केला आहे.

## समारोप

### सूर्यमणीचा प्रवास :



सूर्यमणी

अशाप्रकारे हे घटकसंच अध्यापनशास्त्राद्वारे लैंगिक समस्यांकडे लक्ष देण्याची कल्पनासमजण्यास मदत करेल. हे शिक्षकांना पाठ्यपुस्तकामधील यशोगाथेद्वारे कल समजून घेण्यास मदत करेल तसेच अभ्यासक्रमातून पुरुष किंवा महिला, सामग्री किंवा बदलत्या परिस्थितीत भूमिका वाटपाच्या संदर्भात भाषिक पक्षपातीपणा समजून घेण्यास राजकीय, सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि आर्थिक प्रक्रियांमध्ये महिलांचा सहभाग ओळखण्यास मजकूर आणि विनामजकूर सामग्री इत्यादीमध्ये स्त्रियांचे चित्रणाचे परीक्षण करण्यास यांची मदत होईल. अशा प्रकारे लिंग संवेदनशीलता ही अध्ययन–अध्यापन प्रक्रियेतील समकालीन एकत्रित करण्याची शिक्षकांकरिता एक महत्त्वाची शैक्षणिक चिंता आहे. म्हणूनच हे घटकसंच लिंग संवेदनशील शिक्षणाकडे सूचित करते. ज्यामुळे सर्व लिंगांना त्यांचे कुटुंब समाज व देशांमध्ये सन्मान मिळवून देण्यास मदत करते.

### मूल्यमापन :

### लैंगिक रूढवाद म्हणजे काय?

1. आता आपल्याला लैंगिक समस्याविषयी माहिती आहे. वर्गात या समस्यांकडे लक्ष देण्यासाठी आपण कोणती पावले उचलाल?
2. आपण कोणत्या प्रकारच्या शिक्षण पद्धतीचा वापर कराल. ज्यामुळे मुला–मुलींच्या समान सहभागास प्रोत्साहन मिळेल?
3. आपण वापरत असलेली पुस्तके किती लैंगिक प्रतिसाद सहज देणारी आहे?
4. भाषेच्या वापरामध्ये लिंगभेद रूढीवाद ओळखणे शक्य आहे का?
5. मुले व मुली दोघांनाही विज्ञान शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याकरता तुम्ही कोणते कार्य सुचवाल?
6. गणितामधील समस्या व उदाहरण संग्रह ओळखा. स्त्रियांच्या जीवनाचे, अनुभवांचे वास्तव दर्शविणारे आणि त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकणाऱ्या गणितीय समस्या व उदाहरणे ओळखा.

## REFERENCES :


- NCERT. 1997. Women's Equality and Empowerment through Curriculum – A Handbook for Teachers at Upper Primary Stage. Department of Women Studies,
- ——. 2006. Position Paper. National Focus Group on Gender Issues in Education.
- ——. 2013. Training Material for Teacher Educators on Gender Equality and Empowerment, Vol. I Perspectives on Gender and Society.
- ——. 2013. Training Material for Teacher Educators on Gender Equality and Empowerment, Vol. II Gender and Schooling Society.
- ——. 2013. Training Material for Teacher Educators on Gender Equality and Empowerment, Vol. III Gender and Women's Empowerment,
- ——. 2018. Environmental Studies (Classes III–V). Looking Around.
- ——. 2018. Math–Magic (Classes III–V).
- ——. 2018. Marigold (Class III–V).
- ——. 2018. ITPD Package and Social Sciences (Secondary Level).
- ——. 2018. Our Pasts-III. History Textbook (Class VIII).
- ——. 2018. Social and Political Life-II. Textbook (Class VII).


## Web links :


- https://www.youtube.com/watch?v=aOLYIzJnKT4
- https://www.youtube.com/watch?v=DvBksrnS1RY&t=1s
- https://www.youtube.com/watch?v=wjReU80Nx9U
- https://www.youtube.com/watch?v=jV3wH0hPVRk&t=558s
- https://www.youtube.com/watch?v=daaSNSV7WP4
- https://www.youtube.co


❑❑❑